महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १४ वा दिनांक : २८/०९/२०२४ वार : शनिवार

# मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत युवासेनेचा दणदणीत विजय



**मुंबई** – काही दिवसांपासून सर्वांचे लक्ष असलेल्या मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीचा निकाल समोर आला आहे. या निकालात उद्धव ठाकरे पक्षाच्या युवासेनेचा बोलबाला असल्याचे पाहायला मिळत आहे. युवासेनेने १० पैकी ८ जागांवर विजय मिळवला आहे. सुरुवातीला राखीव पाच जागांचे निकाल लागले. ज्यामध्ये पाचही जागांवर युवासेनेचे पाचही उमेदवार निवडून आले. त्यामुळे सिनेट निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाने बाजी मारली, तर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेला मोठा धक्का बसला आहे.राखीव गटातील युवासेनेचे ५ उमेदवार विजयी ठरले. युवासेनेच्या शीतल देवरुखकर-शेठ यांनी अनुसूचित जाती प्रवर्गातून ५,४९८ मते खेचून आणली. तर त्यांच्या विरोधातील अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे उमेदवार राजेंद्र सायगावकर यांना १,०१४ मते पडली. तर अनुसूचित जमाती प्रवर्गात युवासेनेचे धनराज कोहचाडे यांना ५,२४७ मते मिळाली. तर अभाविपच्या उमेदवार निशा सावरा यांना ९१८ मते पडली. तसेच, युवासेनेचे मयूर पांचाळ हे ओबीसी प्रवर्गातून विजयी झाले. त्यांना ५,३५० मते पडली. तर, महिला प्रवर्गातून विजयी झालेल्या स्नेहा गवळी यांना ५,९१४ मते पडली. तसेच, डॉ. धनराज कोहचाडे यांचा एसटी प्रवर्गातून विजय झाला असून त्यांना ५,२४७ मते मिळाली. तर, एनटी प्रवर्गातून शशिकांत झोरे हे विजयी झाले असून त्यांना ५,१७० मते पडली.तसेच, खुल्या वर्गातही युवसेनेने बाजी मारली असून पाच पैकी दोन जागांवर विजय मिळवला. खुल्या गटामधून युवासेनेचे प्रदीप सावंत, मिलिंद साटम आणि अल्पशे भोईर हे विजयी झाले. याशिवाय खुल्या गटामधून युवासेनेचे इतर दोन उमेदवार हे आघाडीवर असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, सिनेट निवडणुकीमध्ये निकाल हाती येण्याच्या काही तास आधी अखिल भारतील विद्यार्थी परिषद हे युवासेनेविरोधात उच्च न्यायालयात गेले होते.कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयामध्ये सिनेट निवडणुकीच्या आधी युवासेनेचे उमेदवार अल्पेश भोईर यांच्या पोलिंग एजंटमध्ये हेराफेरीचा आरोप अभाविपकडून करण्यात आला. अल्पेश भोईर यांची मते ग्राह्य धरली जाऊ नये तसेच त्यांची सर्व मते बाद करावीत, अशी मागणी अभाविपकडून करण्यात आली.

# मनोज जरांगे यांच्या किडणीवर सूज

**छत्रपती संभाजीनगर** : मनोज जारंगे यांच्या किडणीवर सूज कायम आहे. त्यामुळे, उठण्यास आणि बसण्यास त्रास होत आहे. पोटदुखी, उलटी थांबली आहे, अशी माहिती डॉ. विनोद चावरे यांनी शुक्रवारी, 26 सप्टेंबर रोजी दिली.

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथे नऊ दिवस उपोषणाला बसले होते. त्यामुळे, जरांगे यांची तब्येत खालावली होती. बुधवारी, 25 सप्टेंबर रोजी रात्री शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. गुरूवारी लिव्हर, किडनी, सोनोग्राफी, टू डी इकोची तपासणी केली. या तपासण्यात बदल आढळून आले होते. तसेच किडणीवर देखील सूज होती. जेवण केल्यानंतर पोटदुखी आणि उलटी होत होती. यापैकी शुक्रवारी किडणीवर सूज कायम होती. वरण भात जेवणासाठी दिल्यानंतर पोटदुखी, उलटी थांबली आहे. किडणीवरील सूज उतरण्यास आणखी चार दिवस लागतील. त्यासाठी उपचार सुरू आहे, अशी माहिती डॉ. विनोद चावरे यांनी दिली.




# जयभवानी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त कार्यशाळा संपन्न





**पाटोदा** : कला व विज्ञान महाविद्यालय पाटोदा या ठिकाणी दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी अर्थशास्त्र विभाग आणि भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय पर्यटन दिनानिमित्त मराठवाड्यातील पर्यटनासाठी वाव आणि संधी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.या कार्यशाळेसाठी अध्यक्ष म्हणून प्रा. सोमनाथ घाडगे उपस्थित होते

तर उद्घाटक म्हणून प्रा. विनोद कीर्दक हे होते.या कार्यशाळेसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसंत दादा पाटील महाविद्यालय पाटोदा येथील भूगोल विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.ज्ञानेश्वर चौधरी आणि अर्थशास्त्र विषयाचे विभागप्रमुख डॉ. संजय बोंडगे हे होते.या कार्यशाळेचे उद्घाटक प्रा. विनोद कीर्दक यांनी या कार्यशाळेचे उद्घाटन करून देशाच्या पर्यटन क्षेत्रामध्ये तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगार संधी असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी असे म्हणाले की, मराठवाड्यामध्ये पर्यटन विकास होण्यासाठी भरपूर वाव आहे आणि पर्यटन विकास करण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीसाठी अनेकविध संधी आहेत.परंतु यासाठी शासन पातळीवर आणि सामाजिक स्तरावर पायाभूत सोयीसुविधाआणि समाज जागृती होणे आवश्यक आहे.

या कार्यशाळेतील दुसऱ्या सत्रामध्ये बोलत असताना डॉ. संजय बोंडगे असे म्हणाले की, अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पर्यटन क्षेत्र हे रोजगार संधी निर्माण करणारे क्षेत्र आहे. यामुळे राष्ट्रीय उत्पन्न वाढीसाठी चालना मिळत असते.म्हणून नवीन पिढीने या क्षेत्रातील नवनवीन रोजगार संधींचा शोध घेऊन त्या क्षेत्रामध्ये करिअर केले पाहिजे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सोमनाथ घाडगे असे म्हणाले की, पर्यटन ही संकल्पना भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

त्यांनी याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करत असताना मराठवाड्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि पर्यटनासाठी असणाऱ्या संधी याचा उहापोह केला. या कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बंडू लोखंडे यांनी केले. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. शिवाजी काकडे यांनी केले तर या कार्यशाळेचे आभार भूगोल विभाग प्रमुख प्रा. बजरंग डिसले यांनी मानले. या कार्यशाळेसाठी विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) , शनिवार २८ सप्टेंबर २०२४


# आरक्षण द्या अन्यथा निवडणुकीवर बहिष्कार

## आरक्षणाची तत्काळ अंमलबजावणी करण्याची मागणी




**अहमदनगर** :धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे, अशी गेली ६८ वर्षांपासून मागणी आहे. आजपर्यंत मात्र, केंद्र आणि राज्यातील सर्व सरकारांनी समाजाची फसवणूक केली. धनगर आरक्षणाची लढाई आता अंतिम टप्प्यात आहे. राज्य सरकारने विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या आधी आरक्षणाची अंमलबजावणी केली नाही, तर सकल धनगर समाज विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकेल, असा इशारा सकल धनगर समाजाच्यावतीने सखाराम सरक यांनी शुक्रवार (२७ सप्टेंबर) ला अहमदनगर येथे पत्रकार परिषदेत बोलताना दिला. यावेळी बिरानाना वाघे, राधुआण्णा कोळपे उपस्थित होते.

सखाराम सरक म्हणाले, महाराष्ट्रात लोकसंख्येच्या दृष्टीने धनगर समाजाची लोकसंख्या दुसऱ्या क्रमांकाची आहे. घटनेमध्ये समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्यात आलेले आहे. केवळ धनगर आणि धनगड या शब्द फरकामुळे हा समाज गेल्या ६८ - ७० वर्षांपासून हक्काच्या आरक्षणापासून वंचित आहेत. सत्तेत आल्यानंतर पहिल्या कॅबिनेटमध्ये धनगर आरक्षण अंमलबजावणी आदेश काढू असे २०१४ मध्ये भाजपच्या नेत्यांनी सांगितले होते. आज २०२४ आले तरी आरक्षणाची अंमलबजावणी झालेली नाही. सरकार ने धनगर समाजाला आमदार, खासदार मंत्री पद ही दिले नाही. धनगर समाजा बाबत सरकार केवळ योजनांच्या घोषणा करते. प्रत्यक्ष अंमलबजावनी आणि लाभ कुणालाही मिळत नाही.

धनगर समाजासाठी घोषित केलेल्या किती योजना अंतर्गत समाजाला कर्जवाटप झाले? किती जणांचे व्यवसाय उभा राहिले अथवा किती जणांना नोकऱ्या मिळाल्या याची आकडेवारी सरकारने जाहीर करावी. असे सांगत तर सरक म्हणाले आरक्षणासाठी महाराष्ट्रात विविध ठिकाणी समाज बांधवांनी उपोषण सुरू केले आहे. त्यामुळे हा संघर्ष सर्व व्यापक झाला आहे. या संघर्षाची धार आणखी तीव्र होणार आहे. त्यामुळे सरकारने तत्काळ धनगड जातीचे बोगस जातप्रमाणपत्र रद्द करून धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीचा आदेश काढावा. अन्यथा रस्ता रोको आंदोलन, उपोषण आणि शेवटचा पर्याय हा विधानसभा निवडणुकीवर बहिष्काराचा असेल, असा इशारा याप्रसंगी सखाराम आण्णा सरक यांनी दिला.

दरम्यान, धनगर आरक्षणाची अंमलबजावणी झाली नाही तर नगर जिल्ह्यातील सकल धनगर समाजाच्यावतीने जिल्ह्यात येणाऱ्या प्रत्येक नेत्यांना घोंगडी झेंडे दाखवून तसेच त्यांचे रस्ते आढळून आम्ही आमचा संताप व्यक्त करणार असल्याचे सखाराम सरक (आण्णा) यांनी सांगितले.

## निवडणूक कार्यक्रमात हलगर्जीपणा : शिक्षकाविरुद्ध गुन्हा

**छत्रपती संभाजीनगर :** निवडणुक आयोग यांच्या राष्ट्रीय कामकाज करण्यात हलगर्जी पणा केल्यामुळे एका शिक्षकाविरूध्द लाेकप्रतिनिधी अधिनियम १९५० कलम ३२ नुसार सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राहुल अशोक राठोड असे या शिक्षकाचे नाव आहे.

फिर्यादी संजय नामदेवराव मुठे ५० हे निवडणुक विभागात पर्यवेक्षक म्हणुन कार्यरत आहेत. २६ जुलैला मतदान अधिकारी मध्य विधानसभा मतदार संघ जिल्हाधिकारी कार्यालयाकडून एक आदेशीत पत्र मिळाले. शिक्षक राहुल राठोड यांची नियुक्ती केंद्रस्तरीय अधिकारी म्हणुन करण्यात आली आहे. त्यांना मतदार यादीचे कामकाज पुर्ण करण्यासाठी ते हजर झाले नाहीत. राठोड यांना विभागाच्या वतीने लेखी, तोंडी प्रत्यक्षात नोटीस बजावण्यात आली. तरी देखील राठोड यांनी नोटीसचा खुलासा केला नाही.

राठोड यांना वारंवार फोन करून सुध्दा ते हजर झाले नाही म्हणुन पर्यवेक्षक मुठे यांच्या तक्रारीवरून सिटी चौक पोलिस ठाण्यात राष्ट्रीय कामकाजात हलगर्जीपणा व टाळाटाळ केल्याप्रकरणी लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० कलम ३२ नुसार भारतीय न्याय संहिता कलम २३३ म्हणजे लोकसेवकाने रितसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा केली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.





बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# राज्यस्तरीय जयभीम ढाल अहमदनगर च्या संघाने पटकावले



**छत्रपती संभाजीनगर** : येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या राज्यस्तरीय जयभीम वादविवाद स्पर्धेत न्यु आर्ट्स, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज अहमदनगरच्या संघाने चांदीच्या आकर्षक ढालीसह रोख रू.पाच हजारचे सांघिक पारितोषिक पटकावले.

"निवडणुकीच्या काळातील प्रलोभनांच्या योजना अर्थव्यवस्थेला तारक / मारक आहेत." असा वादविवादासाठी विषय देण्यात आला होता. प्रारंभी स्पर्धेबाबत प्रास्ताविक संयोजक डॉ.नवनाथ गोरे यांनी केले. स्पर्धेच्या नियमाबाबत डॉ. संघरत्न गवई यांनी माहिती दिली. मोहिते आकाश व उशीर महेशर या न्यु आर्ट्स काॅलेज अहमदनगरच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावत जयभीम ढाल काबीज करत रोख पाच हजार रूपयाचे बक्षीस पटकावले.

तर प्रथमेश गिरी व साक्षी बागूल या मा.प. विधी महाविद्यालयाच्या संघाने रू.तीन हजार सह दुसरे पारितोषिक पटकावले. तिसरे पारितोषिक रू.दोन हजारसह आदित्य सदानशीव व आदित्य इंगळे या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संघाने मिळविले. तय उत्तेजनार्थ ग्रंथ स्वरूपातील पारितोषिक संकेत गवई व दिव्या जाधव या मिलिंद कला महाविद्यालयाच्या संघाने मिळविले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून जेष्ठ पत्रकार शांतीलाल गायकवाड, प्रा. एकनाथ फुटाणे, संगणक अभियंता मा.नमीता पाटील, यांनी काम पाहिले. स्पर्धकांना विषयज्ञान, सादरीकरण, उदाहरणे, मसुदा, विवेचन, देहबोली व भाषाशैली याविषयासह सामाजिक भान, समकालीन वास्तवाविषयी जेष्ठ पत्रकार शांतीलाल गायकवाड यांच्यासह प्रसिद्ध वक्त्या नमीता पाटील व डॉ. एकनाथ फुटाने यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धेचा अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. के. खिल्लारे यांनी केला. उपप्राचार्य प्रा.एन.एम. करडेसर यांनी स्पर्धेसाठी आवश्यक अभ्यास, चितंन व वाचनाविषयी मौलिक मार्गदर्शन केले.यावेळी प्रा , महाविद्यालय अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. बी.एन. शिंदे , महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा.एस.पी. खिल्लारे, डॉ. आर.व्ही. मस्के, प्रा. छाया बाथम, प्रा. अनिता वेंकेश्वर , प्रा. आर.बी घोडे , प्रा. अशोक बारगजेसह प्राध्यापक वृंद उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करून वृक्षरूपी भेट देऊन स्वागत करण्यात आले.

स्पर्धेच्या प्रथम पारितोषिकाचे रू.पाच हजार रूपयाचे प्रायोजकत्व उद्योजक भगवान डी. गवई यांनी स्वीकारल्या बद्दल प्राचार्य डॉ.व्ही. के. खिल्लारे यांनी आभार व्यक्त केले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी डॉ. प्रज्ञा रूईकर, डॉ. प्रज्ञा रूईकर, डॉ. राजीव वानखेडे, डॉ. सतीश वाघमारे, डॉ.प्रेमराज वाघमारे, डॉ. यशवंत सुरवसे , डॉ.गणेश खिल्लारे,डॉ. आरती पांडे , डॉ. एस.के. थोरात, डॉ. पूजा वडमारे ,डॉ. तेजश्री चंदनशिवे, डॉ. अशोक केवटे, डॉ. विजय आडे, कार्यालयीन अधीक्षक राजू पट्टेकर, संतोष कुंडेटकर, शेख शब्बीर यांनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचे सूत्रसंचालन डॉ. वनमाला लोखंडे आणि डॉ.ज्योती केदारे यांनी तर आभार प्रा. डॉ. व्ही. जी.पिंगळे यांनी व्यक्त केले.

# माजी मंत्री रोहिदास पाटील यांचे निधन



**धुळे** : काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रोहिदास पाटील यांचे आज सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. रोहित पाटील हे मागील काही दिवासांपासून आजारी होते. आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. ते ८९ वर्षांचे होते. माजी मंत्री रोहिदास पाटील यांच्या निधनाने काँग्रेस पक्षाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चाात दोन मुले, मुलगी, सुना आणि नातवंड असा परिवार आहे.

रोहिदास पाटील यांनी विविध खात्यांच्या मंत्रीपदी काम केले होते. काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष आणि आमदार कुणाल पाटील यांचे ते वडील होते. धुळे जिल्ह्यातील अक्कलपाडा धरण बांधण्यात रोहिदास पाटील यांचा मोठा पुढाकार होता. साधारण सहा महिन्यांपूर्वी माजी मंत्री रोहिदास पाटील कोल्हापुरात आपल्या मुलीकडे गेले असताना त्याची प्रकृती बिघडल्याचं वृत्त समोर आलं होतं. फुप्फुस कमी क्षमतेने काम करीत असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. त्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. त्यानंतर अलीकडे पुन्हा त्यांची प्रकृती खालावली होती.

आज अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

रोहिदास पाटील यांची अंत्ययात्रा 28 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता धुळ्यातील देवपूर येथील त्यांच्या निवासस्थानापासून निघेल आणि एस एस व्ही पी एस महाविद्यालयाच्या प्रांगणात अंत्यसंस्कार करण्यात येतील. तत्पूर्वी, सकाळी 7 ते 10 वाजेपर्यंत नेहरू हौसिंग सोसायटी, देवपूर, धुळे येथील सुंदर सावित्री सभागृहात त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. त्यांच्या अंत्यविधीला काँग्रेसचे नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ सप्टेंबर २०२४


# आम्ही मसापची निवडणूक का लढवित आहोत ?

प्रिय मतदार, हितचिंतक , साहित्यिक मित्र हो, मराठवाडा साहित्य परिषदेच्या आजीव सभासदांनी परिषदेच्या कार्यकारी मंडळावर निवडूण द्यावयाच्या २२ सदस्यांच्या निवडणूक कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे.

नामनिर्देशन पत्र दाखल करावयाच्या मुदतीनंतर अंतीम उमेदवाराची यादी जाहीर झाली आहे. याची आपणास माहिती आहेच.मराठवाडा साहित्य परिषदेचा एक पॅनल व प्रत्यक्ष वाङ्मयीन चळवळीत काम करणाऱ्या विविध संस्थांनी एकत्र येवून परिवर्तन मंच पॅनल करून आपले उमेदवार उभे केले आहे. लोकशाही व्यवस्थेत निवडणूका या अपरिहार्य असतात. प्रत्यक्ष निवडणूकीतून त्या त्या ठिकाणी प्रतिनिधित्व मिळते. त्यामुळे या व्यवस्थेत जाऊन काही तरी चांगले काम करावयाचे असेल तर निवडणूका लढवाव्याच लागतात. त्याला साहित्य संस्थांच्या निवडणूका ही अपवाद नाहीत.

आजपर्यंत मी साधी ग्राम पंचायतचीही निवडणूक लढलो नाही ना सहकारी संस्थांची. मात्र निवडणूका मला नविन नाही. अगदी लहानपणापासून मी ग्रा. पं., जि.प., विधान सभा, लोकसभा आदी निवडणूकीत पत्रके वाटणे, प्रचार करणे, मतदानएजंट म्हणून काम करणे, प्रचार यंत्रणा सांभाळणे, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी मदत करणे. आदी कामे अगदी प्रामाणिकपणे करीत आलो आहे. अगदी नोकरी लागल्यावरही मतदान अधिकारी, केंद्राध्यक्ष, मास्टर ट्रेनर ते मतमोजणी आदी कामे यशस्वीपणे केली आहेत.

परंतु स्वतः निवडणूक लढण्यापासून दूरच राहिलो. अनेकांना मोठे करण्यात निवडूण आणण्यात मदतच केली. कोणताही हेतू न ठेवता. स्वतःचे लेखन, वाचन करीत असतांना अनेक चांगले वाईट अनुभव आले. नवोदित कवी, लेखकांना फारसी संधी मिळायची नाही. काहींनाच जवळ करून ठिकठिकाणी संधी दिली जायची. हे खुप खटकायचे. त्यामुळेच नव्या पिढीतील लेखकांना न्याय देता यावे म्हणून तिफण त्रैमासिक २००९ मध्ये सुरू केले. पंधरा वर्ष ते सातत्याने सुरू आहे. तिफण त्रैमासिक, तिफण प्रकाशन, तिफण डिजिटल, तिफण वाचक चळवळ, तिफण सखी मंच, बोलीभाषा व लिपी संशोधन प्रशिक्षण केंद्र, आदींच्या माध्यमातून अनेकांना संधी दिली. विविध कविसंमेलने, साहित्य लेखन स्पर्धा, राष्ट्रीय चर्चासत्रे, साहित्य लेखन शिबिरे, निबंध, कविता, कथा लेखन स्पर्धा, तिफण पुरस्कार, तिफण राज्यस्तरीय कविता



महोत्सव या माध्यमातून खेड्या पाड्यात साहित्य चळवळ वाढविली. अनेक नवे लेखक, कवी त्यातून तयार झाले. पुस्तक प्रकाशनासाठी अनेकांना मदत केली. तिफणचे २५ विशेषांक प्रसिद्ध केले. माझे स्वतःचे प कविता संग्रह प्रसिद्ध असून अन्य १० पुस्तके प्रसिद्ध आहे. पुढे २०१३ मध्ये भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेच्या माध्यमांतून ग्रामीण भागात अनेक उपक्रम घेतले, भूमिजन साहित्य संमेलने घेऊन भूमिजन पुरस्कार दिले. हे करतांना हा जवळचा तो लांबचा, त्याची जात पात याचा कधिही विचार केला नाही. उपेक्षित, दुर्लक्षित लेखकांना संधी व मान्यवरांचा सन्मान केला आहे. या वाटचालीत स्वतः साठी काहीच मागीतले नाही. मातीतले असेल तर इतरांसाठी. मी मसापशी विद्यार्थी असल्यापासून संबंधित आहे. अनेक कार्यक्रमांना मी हजेरी लावलेली आहे. काही संमेलनात मला कविसंमेलनात संधी मिळाली. परंतु स्वतंत्रपणे किंवा स्वागत सारख्या कार्यक्रमात किंवा साधे सूत्र संचलन करण्याची, कुणाचा सत्कार करण्याची संधीही मिळाली नाही की प्रतिष्ठान मध्ये संधी मिळाली. त्या उलट आमच्या पेक्षा नव्याने लिहिणाऱ्या तेही जवळचे व मुठभर लोकांना वारंवार संधी मिळते. आमच्या चळवळी व व्यासपीठे नसती तर आम्ही या क्षेत्रात कुठेच दिसलो नसतो. आमचे जाऊ द्या इतरही अनेक लेखक कवी दिसले नसते. आज मराठवाड्यात जी नवी पिढी लिहिते आहे. तिफण व संशोधन परिषदेच्या उपक्रमातून घडली आहे. कोणतेही आर्थिक पाठबळ नसतांना आम्ही नवोदित लेखक कविंना व्यासपीठे मिळऊन दिली. मात्र मसापने आम्हाला कायमच दूर ठेवले. आजची स्थिती पाहता मसाप चा उपयोग नव्या लेखकांना व्हावा, जे दर्जेदार लिहिणारे मान्यता प्राप्त लेखक कवी आहे त्यांना संधी मिळावी, मसापचे वर्तुळ मोठे व्हावे ती आपली संस्था आहे असे प्रत्येकाला वाटले पाहिजे. सदस्यही ठराविक लोकांनाच करून घेतले जाते. जे लिहिणारे आहे पण आपल्या सोईचे नाही त्यांना दूर ठेवले जाते. एका एका व्यक्तिचे, संस्था चालकांचे आणि एकाच ठराविक कुटूंबातील लोक सदस्य आहे हे फक्त निवडणूका डोळ्या समोर ठेऊन केले गेले आहे. इतरांच्या पुस्तकावर नकारात्मक बोलून कार्यक्रम पाडून टाकायचा त्यांचा अपमान करायचा हे आम्ही स्वतः अनुभवले आहे. तर काही लोकांचा अवास्तव उदो उदो करायचा हे नेहमीचेच आहे. त्यामुळे तिकडे फिरकावे ही वाटत नाही.

मराठवाडा साहित्य परिषद ही महत्वाची संस्था आहे. साहित्य संमेलने किंवा अन्य उपक्रमात काही ठराविक लोकांनाच नेहमी संधी मिळते. अनेक दर्जेदार लेखन करणारे साहित्यिक दुर्लक्षित राहतात. नव्या पिढीतील लेखकांना मार्गदर्शक ठरणारे उपक्रम होत नाही. मसाप सभागृहाचे भाडे पाच हजार रू. आहे. नवोदित लेखकांना पुस्तक प्रकाशनासाठी ते परवडत नाही. सर्वांना सामावून घेतले जात नाही. त्यामुळे मसापच्या कार्यक्रमाला लोक येत नाही. याचे आत्मचिंतन करण्याची गरज आहे. मसापच्या कार्यकारी मंडळावर ही तेच तेच लोक निवडूण आणले जातात.

सभासदांना व नव्या लेखकांना केवळ खोटी आश्वासने द्यायची. त्याला झुरवत ठेवायचे, ठराविक तालुका व जिल्हयात शाखा द्यायच्या. सोईचे लोक नसतील तर तिथे शाखा सुरू करावयाच्या नाही. उमेदवारी अर्ज भरणाऱ्यांना धमकावयाचे. हे प्रकार अत्यंत वाईट आहे . ही साहित्य संस्थेची निवडणूक आहे. आम्हाला जे लोक संधी देतील आम्ही तिकडे जावू. आम्हाला कोणीही वर्ज्य नाही. साहित्याच्या क्षेत्रात दाप दडपशाही नसावी. मराठवाड्यातील वाङ्मयीन चळवळीत मी ३० वर्षापासून माझ्या परिने काम करीत आहे. मसापच्या बहुतांश कार्यक्रमांना हजर असतो. आमच्या सारखा लोकांना कधी संधी मिळणार. निवडणूकीतील मतदान प्रक्रियाही सदोष व पारंपारिक आहे. त्यात आवश्यक तो बदल केला जात नाही.

मी वाङ्मयीन चळवळीत काम करणारा कार्यकर्ता, कवी व संपादक आहे. मला परिवर्तन मंचने उमेदवारी दिली . कुणाला विरोध करण्यासाठी किंवा कुणाच्या विरोधात मी निवडणूक लढवित नसून नव्या लेखकांसाठी काम करता यावे व मसापने सर्वांना समान न्याय द्यावा. यासाठी निवडणूक लढवित आहे. मराठवाड्यात व महाराष्ट्राच्या वाङमयीन क्षेत्रात आजपर्यंत केलेल्या कामाची पावती म्हणून साहित्यिक, मतदार मला मते देतील हा मला विश्वास आहे. निवडणूका लढल्याच पाहिजे कारण स्वतःला अजमावता येते.

आपल्या कामाचे मूल्यमापन करून आत्म चिंतन करता येते तसेच माणसं ओळखता येतात. मला काही मिळवायचे यासाठी मी ऊभा नाही. पुढेही काही मिळेल की नाही याचीही मला तमा नाही. अत्यंत प्रामाणिकपणे मी आजपर्यंत काम करीत आहे. पुढे ही करीत राहणार आहे. मराठवाडा साहित्य परिषदेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांशी माझे जवळचे संबंध आहे. कुणा विषयी आकस व व्देष म्हणून मी ऊभा नाही तर या माध्यमातून मसापला गाव खेड्यात घेऊन जाता यावे, मसाप चे कार्य व्यापक करता यावे हा माझा उद्देश आहे. पाठिमागे कार्यपद्धतीवर बोलणारे अनेक लेखक, सभासद आहेत. मात्र निवडणूक काळात ते पुढे येत नाही.

आपल्याला संधी मिळणार नाही, पुरस्कार मिळणार नाही. ही त्यांना भिती असते. साहित्यातून शोषण, अन्याय आणि अत्याचारावर बोलणारे लिहिणारे, परिवर्तनाचा विचार मांडणारे साहित्यिक इतके लाचार होतात हे अनुभवावयास मिळते. प्रत्येकाला संविधानाने मताचा, उभे राहण्याचा अधिकार दिला आहे. निवडणूका त्या प्रक्रियेचा एक भाग आहे. आमचा लढा कोणा व्यक्ती विरोधी नाही तर कार्य पद्धतीवर आहे. या निमित्ताने मी सर्व मतदार बंधू - भगिनींना विनंती करतो की, आपण कोणत्याही भूलथापाला आमिषाला बळी न पडता मला व परिवर्तन मंचच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करावे.

आमच्याकडे एकगठ्ठा मत पत्रिका नाही, कोणती आमिषे नाही की कोणती यंत्रणा. कदाचित आम्हास आपल्या पर्यंत पोहचता येईलच असेही नाही. आम्ही सोशल मिडिया व फोनच्या माध्यमातून तर कधी काहींना प्रत्यक्ष भेटून जसे जमेल तसे संपर्क करण्याचा प्रयत्न करू. आम्हाला विजयाचा ही अहंकार व गर्व नाही की पराभूत होण्याची चिंता. आपण सुज्ञ आहातच. आपण आम्हाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य, मदत व मत देऊन साहित्य क्षेत्रात व्यापक व चांगले काम करण्याची संधी द्यावी. ही नम्र विनंती.


**डॉ. शिवाजी हुसे,**
**परिवर्तन मंच, उमेदवार**
**मराठवाडा साहित्य परिषद निवडणूक — २०२४**
**लेखकाचे मो. नं. - 94040 00398**


# गुरुकुलम् शिशुवाटिका येथे सुवर्ण प्राशन संस्कार शिबिर



**बदनापूर :** येथील गुरुकुलम् शिशु वाटिका येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व बौद्धिक क्षमता वाढीसाठी छत्रपती हॉस्पिटल,बदनापूर यांच्या वतीने सुवर्ण प्राशन संस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. पुष्य नक्षत्राच्या मुहूर्तावर आयोजित या शिबिरात डॉ.अनुराधा पाटील यांनी शाळेतील चिमुकल्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना सुवर्ण प्राशन या आयुर्वेदिक औषधीचे डोस दिले. या प्रसंगी शाळेचे अध्यक्ष भगवानराव मात्रे,सचिव डॉ.रामेश्वर पाटील,उपाध्यक्ष श्री.गणेश जऱ्हाड,ऍड.बालाजी वाघ श्री. सुदाम मात्रे,शाळेच्या शिक्षिका अश्विनी डीघे,ज्योती दांडगे व आलेश कांबळे या उपस्थित होत्या. या शिबिराला भरभरून प्रतिसाद लाभला असून , 43 विद्यार्थ्यांना याप्रसंगी सुवर्ण प्राशन देण्यात आले.

# पॉर्न अभिनेत्री रिया बर्डे भारतीय नसून बांगलादेशी

## बनावट कागदपत्रे बनवून कुटुंबासह भारतात राहिली



**मुबई :** भारतीय पॉर्न इंडस्ट्रीत आरोही बर्डे आणि बन्ना शेख या नावांनी प्रसिद्ध असलेली पॉर्न अभिनेत्री रिया बर्डे हिला गुरुवारी अटक करण्यात आली. ती बांगलादेशी असल्याचे पुरावे पोलिसांना मिळाले आहेत. वृत्तांवर विश्वास ठेवला तर रिया बर्डे ही मूळची बांगलादेशची असून ती बनावट कागदपत्रे बनवून संपूर्ण कुटुंबासह भारतात राहिली होती. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर तिला ठाणे, मुंबई येथून अटक करण्यात आली.

हिल लाइन पोलिसांनी रिया बर्डे आणि तिच्या कुटुंबाविरुद्ध भादंवि कलम ४२०, ४६५, ४६८, ४७९, ३४ आणि १४ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. रिया बर्डे ही बांगलादेशी असल्याचा आरोप होत आहे. तिच्याकडे बनावट भारतीय पासपोर्टही सापडला आहे. याशिवाय तिच्या घरातील संपूर्ण कुटुंबाची कागदपत्रेही बनावट आहेत.

या प्रकरणाचा तपास करत असलेले उपनिरीक्षक संग्राम मालकर यांनी रिया बर्डेची आई बांगलादेशी असल्याचे माध्यमांना सांगितले आहे. आपल्या दोन मुली आणि मुलासह ती बेकायदेशीरपणे भारतात आली आणि इथेच स्थायिक झाली. काही वर्षांपूर्वी तिने अमरावती येथील एका व्यक्तीशी लग्न केले असून, ती पश्चिम बंगालची आहे. नंतर त्याच्या मदतीने तिने स्वतःसाठी आणि मुलांसाठी बनवलेले बनावट कागदपत्रे मिळवून दिली. स्वत:ला भारतीय असल्याचे सिद्ध करण्यासाठी त्याच्याकडे जन्म प्रमाणपत्रापासून पासपोर्टपर्यंतची अनेक बनावट कागदपत्रे आहेत. या बर्डेचा जवळचा मित्र प्रशांत मिश्रा याला ती भारतीय नसून बांगलादेशी असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही बाब समोर आली. प्रकरण गांभीर्याने घेत प्रशांतने ही माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी रियाची सर्व कागदपत्रे तपासली असता ती बांगलादेशी असल्याचे पुरावे मिळाले.

रियाशिवाय तिची आई अंजली बर्डे (रुबी शेख), वडील अरविंद बर्डे, भाऊ रवींद्र बर्डे (रियाज शेख) आणि बहीण रितू (मोनी शेख) यांचीही नावे तक्रारीत नमूद आहेत. रियाचे आई-वडील सध्या कतारमध्ये आहेत, तर तिच्या भावंडांचा शोध सुरू आहे.

बनावट पासपोर्ट प्रकरणापूर्वी रिया बर्डे हिलाही वेश्याव्यवसायप्रकरणी अटक करण्यात आली होती. रिया बर्डे हे पॉर्न इंडस्ट्रीतील एक प्रसिद्ध नाव आहे. ती अनेक प्रोडक्शन हाऊसशी संबंधित आहे, जे पॉर्न कंटेंट तयार करतात. रिया बर्डे उल्लू अॅप आणि अनेक पॉर्न वेबसाइटसाठी काम करते.


